क्र.नो.म.नि./का.८/अंलेप/निपटारा/ 166/२०१२
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य्, यांचे कार्यालय, पुणे
दिनांक - 1 /०३/२०१२

## परिपत्रक

**विषय :- अंतर्गत लेखा परीक्षण पथकाच्या निरीक्षण अहवालामधील प्रलंबित परिच्छेदांचा निपटारा शीघ्रगतीने करणेबाबत**

महसूली वर्ष सन २०११-१२ च्या सुरुवातीस दि.०१/०८/२०११ रोजी ११४८ परिच्छेद प्रलंबित असून दि.३१/०१/२०१२ अखेर त्यामध्ये २५३ परिच्छेदांची भर पडली असून अशा एकूण १४०१ परिच्छेदांपैकी ४४ परिच्छेदांचा निपटारा करण्यात आला असून १३५७ परिच्छेद प्रलंबित आहेत. परिच्छेदांची निपटारा टक्केवारी ३.८३ % आहे. चालू महसूली वर्षाच्या सुरुवातीस आक्षेपित रक्कम रु.३,९५,०४,२२६/- असून त्यामध्ये रु.१,४५,४१,३६९/- ची भर पडली असून एकूण आक्षेपित रक्कम रु.५,४०,४५,५९५/- मधील रक्कम रु.१,२९,४१३/- ची वसूली/समायोजन करण्यात आलेले आहे. उर्वरित आक्षेपित रक्कम रु.५,३९,१६,१८२/- आहे. आक्षेपित रक्कम वसूलीची टक्केवारी ०.३३ % आहे. परिच्छेदांचा निपटारा आणि आक्षेपित रक्कमांची वसूली याबाबतची कामगिरी अत्यंत असमाधानकारक असून प्रशासकीयदृष्टया अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे.

प्रलंबित परिच्छेदांपैकी काही परिच्छेद हे गेल्या २२ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित असून अधिनस्त कार्यालयाच्या स्तरावरुन मिळणारा प्रतिसाद अत्यंत असमाधानकारक आहे. अनेक प्रकरणी अंतर्गत लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून त्याबाबतचा प्रथम अनुपालन अहवाल एक महिन्याच्या आत या कार्यालयास सादर करण्याची दक्षता घेण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. याबाबत या कार्यालयाने वेळोवेळी पत्रे/स्मरणपत्रे/आढावा बैठका याव्दारे पाठपुरावा करुनही प्रलंबित परिच्छेदाची संख्या कमी झाल्याचे तसेच आक्षेपित रक्कमेची वसूली झाल्याचे दिसून येत नाही.

शासन निर्णय दि.०८/०८/२००६ अन्वये शासनाने वित्तीय प्रकरणांबाबत जबाबदार असणारे अधिकारी/कर्मचारी निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार अंतर्गत लेखा परीक्षणामधील परिच्छेदांच्या निपटा-यासाठी या विभागाच्या अधिनस्त असणारे सर्व कार्यालय प्रमुख, शाखा प्रमुख संबंधित अधिकारी/कर्मचारी हे संयुक्तिकपणे जबाबदार आहेत.

शासन परिपत्रक दि.२५/०४/२००५ अन्वये शासनाने विविध कामाची उदिदष्टे आणि त्यानुसार पूर्तता न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये नियम-१० खाली द्यावयाच्या किरकोळ शिक्षा याबाबतची माहिती देण्यात आलेली आहे.

वरील बाबींचा विचार करुन आता अंतर्गत लेखा परीक्षणामधील प्रलंबित परिच्छेदांचा निपटारा जलद गतीने होण्यासाठी खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) प्रत्येक कार्यालयाने दरमहा किमान चार परिच्छेदांचे अनुपालन लेखा परीक्षण कक्षास सादर करावे.

२) चालू महसूली वर्षाच्या सुरुवातीस प्रलंबित असणा-या परिच्छेदांपैकी किमान ५० % परिच्छेदांचा निपटारा प्रत्येक सहामही कालावधीत करावा.

३) सन २००४ पर्यंतच्या अहवालामधील सर्व प्रलंबित परिच्छेदाचा निपटारा दि.३१/०३/२०१२ पर्यंत करण्याची दक्षता घेण्यात यावी.

४) शक्यतो ५ वर्षापेक्षा जास्त जुन्या असणा-या सर्व प्रलंबित परिच्छेदांचा निपटारा चालू महसूली वर्षात (३१ जुलैपर्यंत) करावा.

५) ज्या परिच्छेदांमध्ये आक्षेपित रक्कम मोठया प्रमाणामध्ये गुंतलेली आहे. अशा परिच्छेदांचा निपटारा प्राधान्याने करावा.

६) या कार्यालयास अनुपालन सादर करताना संबंधित पत्रावर अहवालाचे वर्ष व नस्ती क्रमांक नमूद करण्याची दक्षता घ्यावी.

७) निरीक्षण अहवालामधील परिच्छेदांचे अनुपालन सादर करताना त्या समवेत आवश्यक ती कागदपत्रे जोडावीत. परिच्छेदांचे अनुपालन सादर करताना त्या समवेत जोडलेली कागदपत्रे उदा. चलन, पावती इ.च्या झेरॉक्स प्रती साक्षांकित करुन सादर कराव्यात.

८) निरीक्षण अहवालामधील एखादा परिच्छेद अमान्य असेल, तर तो का अमान्य आहे, याबाबत आवश्यक ते स्पष्टीकरण देऊन स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेल्या संदर्भाच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. उदा. कायदयामधील तरतूदी, शासन निर्णय,शासन परिपत्रक, वरिष्ठ कार्यालयाचे आदेश, परिपत्रक इ. अमान्य परिच्छेदांचे अनुपालन हे थेट या कार्यालयास सादर न करता वरिष्ठ कार्यालयामार्फत त्यांच्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

९) अनुपालन अहवाल सादर करताना एखादया कार्यालयाकडे दोन किंवा त्यापेक्षा जास्त लेखा परीक्षण अहवाल प्रलंबित असतील, तर अशा प्रत्येक अहवालाचेही अनुपालन स्वतंत्र पत्राव्दारे सादर करावे. कोणत्याही परिस्थितीत दोन लेखा परीक्षण अहवालाचे अनुपालन एकाच पत्रामध्ये सादर करु नये.

१०) लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झालेनंतर त्यामधील परिच्छेदांबाबतचा प्रथम अनुपालन अहवाल एक महिन्यात या कार्यालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

११) अनेक प्रकरणांमध्ये अनुपालन अहवाल सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडे आदेश मिळण्यासाठी सादर करण्यात आलेले आहेत, असे या कार्यालयास कळविण्यात येते. प्रदीर्घ कालावधी होऊनसुध्दा अशा प्रकरणांमध्ये सह जिल्हा निबंधक यांचे कार्यालयाकडून आदेश पारीत करण्यात आलेले नाहीत, असे निदर्शनास येत आहे. तरी ज्या कार्यालयाचा परिच्छेद प्रलंबित आहे अशा कार्यालयाच्या प्रमुखाची सदरच्या परिच्छेदाबाबत वरिष्ठांचे आदेश प्राप्त करुन घेऊन त्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन या कार्यालयास अनुपालन सादर करुन परिच्छेद वगळून घेणे ही सर्वस्वी जबाबदारी आहे.

१२) मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम क्र. ५३-अ खाली या कार्यालयाकडून आदेश मिळण्यासाठी सादर करण्यात आलेल्या प्रकरणांबाबत कार्यासन अधिकारी क्र.१४ यांचेकडे पाठपुरावा करुन आदेश प्राप्त करुन घ्यावेत व त्याप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

१३) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांनी आपल्या विभागामध्ये तसेच सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील अधिनस्त तसेच खुदद कार्यालयाकडील प्रलंबित परिच्छेदांचा आढावा दरमहा आढावा बैठकीमध्ये घ्यावा आणि प्रलंबित परिच्छेदांचा निपटारा जलदगतीने करणेबाबत संबंधितांना सूचना दयाव्यात.

१४) शासनाने ठरवून दिलेल्या उदिदष्टाप्रमाणे महसूली वर्षाच्या सुरुवातीस प्रलंबित असणा-या परिच्छेदांपैकी प्रत्येक सहामही कालावधीत किमान ५० % किंवा त्यापेक्षा जास्त परिच्छेदांचा निपटारा उदिदष्ट साध्य करणा-या अधिकारी/ कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालामध्ये त्यांच्या चांगल्या कामगिरीबाबत नोंद घेण्यात यावी.

१५) शासनाने दिलेले निपटारा उदिदष्ट साध्य न करणा-या अधिकारी/ कर्मचारी यांचे बाबतीत त्यांच्या अत्यंत असमाधानकारक/ असमाधानकारक निपटारा कामगिरीबाबत त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये नोंद घेण्यात यावी.

उपरोक्त निर्देश खुदद व अधिनस्त कार्यालयामधील अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास त्वरित आणून दयावेत आणि त्यानुसार कार्यवाही होईल, असे पाहावे.

सदर परिपत्रक नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्यांचा सांकेतांक क्र. असा आहे.

का.प्र.मा.नों.म.नि. यांचे सहीची असे.

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे करिता**

प्रति

१) मा.उप-सचिव (पीएसी-१) महसूल व वन विभाग मंत्रालय,मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२) मा.उप-सचिव (म-१) महसूल व वन विभाग मंत्रालय,मुंबई यांना माहितीस्तव सादर.
३) अप्पर मुद्रांक नियंत्रक, प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई
४) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक / मुद्रांक उपनियंत्रक
५) सर्व सह जिल्हा निबंधक / मुद्रांक जिल्हाधिकारी
६) व्यवस्थापक, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे
७) दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी मुंबई शहर/ मुंबई उपनगर बांद्रा
८) सर्व सह दुय्यम निबंधक / दुय्यम निबंधक
९) सर्व सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे
१०) निवड नस्ती लेखा अधिकारी, कार्यासन क्र.८, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे